## योजना :- सौर अभ्यासिका

**प्रस्तावना :-** ग्रामिण भागातील विद्यार्थीना लोडशेडीगच्या काळात अभ्सासाठी एका ठिकाणी येऊन अभ्यास करण्यासाठी सोय व्हावी म्हणुन उद्योग उर्जा व कामगार विभाग,शासन निर्णय क्र. सौर२००८/ प्रक्र.१०४१ /उर्जा-७ दिनांक २० जानेवारी, २०१० सौर अभ्यासिका दिप योजना राबविण्यात येत आहे.
या योजनेंर्तगत महाऊ र्जा मार्फत ९०% हिस्सा व ग्रामपंचायत मार्फत १०% हिस्सा घेऊन सौर अभ्यासिका दिप प्रकार -४ हे संयत्र आस्थपित करण्यात येत आहे.

निवडीचे निकष :-

१. सदर गावाची निवड पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजने निवड झालेली असावी.
२. सदर ग्रामपंचायत संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियात जिल्हास्तरीय निवडलेले असावे
३. सदर गावामध्ये निर्मल भारत अभियानात ६०% शौचालयाचे बांधकाम पुर्ण झालेले असावे.
४. ग्रामपंचायतीमध्ये विशेष नाविन्यपुर्ण कार्यक्रम राबविण्यात आलेले असावे.
५. सदर ग्रामपंचायतीची लोकसंख्येच्या आथारावर निवड करण्यात येते.

निधी :- महाऊर्जा मार्फत ठरवुन दिलेल्या किंमती पैकी ९०% निधी महाऊर्जा मार्फत व १०% निधी ग्रामपंचायत मार्फत देण्याची तरतुद आहे.

## योजना :- सौर पथ दिवे

**प्रस्तावना :-** शासन निर्णय दिनांक २७ ऑक्टोबर, २०१० नुसार ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेसाठी पात्र झालेल्या आणि ज्या ग्रामपंचायतीची लोकसंख्या १००० पेक्षा कमी आहे अशा ग्रामपंचायतीच्या रस्त्यांवर सौर पथ दिवे बसविण्यासाठी केद्र व राज्यशासन व ग्रामपंचायती हिस्सा यांचे सयुक्त निधीतुन निवड झालेल्या ग्रामपंचायती मध्ये ३ नग सौर दिप लावण्यात येतात.

निकष :- १. ग्रामपंचायतीची निवड पर्यावरण सतुलित समृध्द ग्राम योजनेमध्ये निवड झालेली असावी. व तीची लोकसंख्या हि १००० च्या आत असावी.
२.तसेच शासना वेळोवेळी ठरवुन दिलेले निकष

निधी :- महाऊर्जा मार्फत ठरवुन दिलेल्या किंमती पैकी केद्र शासन व राज्य शासन तसेच ग्रामपंचायत हिस्सा तिन्हीच्या सयुक्त निधी व्दारे देण्याची तरतुद आहे.